


# भाषेचे फायदे

लेखन: **नीलाताई**
चित्र: **रेशमा बर्वे**

सकाळ प्रकाशन

# भाषेचे फायदे





लेखन: **नीलाताई**

चित्र: **रेश्मा बर्वे**

सकाळ प्रकाशन

एका घरात मंकू उंदरिणीचं बीळ होतं. त्यात तिच्यासोबत चंकू, ढंकू, पंकू आणि संकू ही तिची पिलं राहात होती.





एके दिवशी मंकूबाई पिलांना रागवत होत्या,

''सारखी सांगतेय् बाहेर जाऊ नका ! पण ऐकत नाहीत.''

''बसा गुपचूप बिळातच. बाहेर जिवाला धोका आहे.''



त्या असं सांगत असतानाच संकू बाहेर सटकला.

चंकू, ढंकू आणि पंकू ओरडायला लागले, "आई गं, तो कसा गेला? आम्हीपण जाणार !" मंकूबाई म्हणाल्या, "अरे, ऐका माझं!"





तेवढ्यात बाहेरून संकूचा 'चीं-चीं' आवाज ऐकायला आला. तिन्ही पिलं पळू लागली. मंकूबाई पुन्हा ओरडल्या, "थांबा आतच. बाहेर काय झालंय् ते मी बघते. बाहेर जर माणूस असेल तर घाबरायचं काही कारणच नाही.



मांजर किंवा बोका असेल, तर मात्र काही खरं नाही...
पण मी बघते ना! तुम्ही थांबा !"



मंकूबाईनी बिळाच्या दारातून डोकावून


पाहिलं तर संकूला एका मांजरानं धरलेलं होतं.





मंकूबाई थोड्याशा घाबरल्या. मग सावरल्या. त्यांनी डोकं चालवलं. तोंडाजवळ पुढच्या पायाचा पंजा धरून मंकूबाईंनी 'भोऽऽ भोऽऽ' असा आवाज काढला.







तो आवाज ऐकताच मांजर पळून गेलं.



त्याच्या हातातून सुटलेला संकू
जागच्या जागीच थरथरत
उभा होता.

त्याला घेऊन मंकूबाई आत आल्या.
संकूच्या पाठीवरून पंजा फिरवत सगळ्यांना म्हणाल्या,
"बरं का रे बाळांनो, आता कळलं ना तुम्हाला?"
"आपल्याला दुसरी भाषा येत असेल, तर
कसे फायदे होतात !"





₹ 40/-

# मजेशीर गोष्टींची रंगीत पुस्तके

डुग्गूच्या मजेदार कल्पनांच्या राज्यात
फिरवून आणणाऱ्या या 'डुग्गूच्या गोष्टी'.










ISBN 978-93-80571-20-1
9 789380 571201 >
₹ ४०

सकाळ प्रकाशन